हारना सबसे बड़ी असफलता नहीं है परंतु हारने के बाद प्रयास करना छोड़ देना हमारी सबसे बड़ी असफलता है।

दैनिक
लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ
dainiklokaarambh@gmail.com
LOK AARAMBH
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले
बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | शनिवार २२ फेब्रुवारी २०२५ | अंक ७५ • पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु




# मला हलक्यात घेऊ नका, मी बाळासाहेबांचा कार्यकर्ता; एकनाथ शिंदेंचा नेमका कोणाला इशारा?

## एकनाथ शिंदेंना धमकी

एकनाथ शिंदे यांच्या कारला उडवून देऊ असा धमकीचा एक इमेल प्राप्त झाला होता. या प्रकरणात आता मुंबई पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे. बुलढाणा जिल्ह्यातून दोन व्यक्तींना अटक करण्यात आलं आहे.मंगेश वायल आणि अभय शिंगणे अशी अटक करण्यात आलेल्या व्यक्तींची नावं आहेत. हो दोघेही देऊळगाव राजाचे रहिवासी असल्याची माहिती समोर येत आहे. या बाबत माहिती देताना एका पोलीस अधिकाऱ्यानं सांगितलं की, एकनाथ शिंदे यांच्या कारला बॉम्बने उडवून देण्याच्या धमकीचा मेसेज गोरेगावमधील जेजे मार्ग पोलीस ठाण्याला प्राप्त झाला होता.या प्रकरणात गुन्हा दाखल केला असून, दोघांना अटक करण्यात आलं आहे.दरम्यान यावर देखील एकनाथ शिंदे यांनी प्रतिक्रिया दिली आहे.मला या आधी देखील अनेकदा धमक्या मिळाल्या आहेत. जीवे मारण्याच्या धमक्या देण्यात आल्या, पण मी भीत नाही असं एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे.

राज्यात पुन्हा एकदा महायुतीचं सरकार आलं. महायुतीचं सरकार आल्यापासून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे सातत्यानं आपल्या वेगवेगळ्या वक्तव्यांमुळे चर्चेत आहेत. एकनाथ शिंदे हे सातत्यानं शिवसेना ठाकरे गट प्रमुख उद्धव ठाकरे आणि विरोधकांवर जोरदार हल्लाबोल करत असल्याचं पाहायला मिळत आहे. दरम्यान आता त्यांनी पुन्हा एकदा जोरदार निशाणा सधाला आहे. मला हलक्यात घेऊ नका, ज्यांनी मला हलक्यात घेतलं त्यांना मी आधीच सांगितलं होतं की मी पक्षाचा एक सामान्य कार्यकर्ता असलो तरी मी बाळासाहेब ठाकरे यांचा कार्यकर्ता आहे. त्यामुळे जे मला हलक्यात घेत आहेत, त्यांनी ही गोष्ट समजून घ्यावी असं एकनाथ शिंदे यांनी म्हटलं. दरम्यान एकनाथ शिंदे यांच्या वक्तव्यामुळे राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आलं असून, एकनाथ शिंदे यांचा हा इशारा नेमका कोणासाठी होता? याची चर्चा सुरू झाली आहे

### नेमकं काय म्हटलं शिंदेंनी?

जेव्हा तुम्ही मला २०२२ मध्ये हलक्यात घेतलं तेव्हा तुमचा टांगा पलटी झाला. मी सरकार बदललं.



आम्ही सामान्य लोकांच्या मनातील सरकार आणलं. मी विधानसभेत माझ्या पहिल्याच भाषणात म्हटलं होतं की, देवेंद्र फडणवीस यांना दोनशे पेक्षा जास्त जागा मिळतील, आणि आम्हाला २३२ जागा मिळाल्या. त्यामुळे मला हलक्यात घेऊ नका. ज्या लोकांना हा इशारा समजून घ्यायाचा आहे, त्यांनी समजावा. मी फक्त माझं काम करत आहे.

# बीडचे खा.बजरंग सोनवणेंची परदेशात क्रेझ; शिवजयंतीनिमीत्त आले अबुधाबीतून निमंत्रण
## २३ फेब्रुवारी मोठ्या थाटात शिवजन्मोत्सव होणार साजरा



केजः महाराष्ट्रासह देशभरात आणि आता जगभरात छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी होत आहे. यावर्षी अरब देशातील अबुधाबीमध्ये दि.२३ फेब्रुवारी रोजी छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्सवाचे आयोजन करण्यात आलेले असून या कार्यक्रमाला प्रमूख पाहूणे म्हणून बीडचे खा.बजरंग सोनवणे यांना निमंत्रीत करण्यात आले आहे.छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती जगभरातील विविध देशात साजरी केली जात आहे. महाराष्ट्र आणि हिंदूस्थानातील नागरिक परदेशात आता शिवजयंती साजरी करू लागले आहे. अरब देशातील अबुधाबी येथे मागील सात वर्षांपासून उमेश नळगे पाटील, प्रदिप आघाव हे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीचे आयोजन करत आहेत. यावर्षीही जयंती उत्सव मोठ्या जल्लोषात साजरा करण्यात येत आहे. दरवर्षी वेगवेगळ्या क्षेत्रातील मान्यवरांना या जयंती उत्सवाचे निमंत्रण दिले जात असते. यावर्षी बीड जिल्ह्यातील जनतेने मोठ्या विश्वासाने निवडून दिलेले खा.बजरंग सोनवणे यांना प्रमुख म्हणून निमंत्रीत केले आहे. त्यांच्यसोबत मोलीजीराजे शाहू छत्रपती, मंत्री आयुष स्वतंत्र प्रभार आरोग्य व कुटूंब कल्याण राज्यमंत्री भारत सरकार-ना. प्रतापराव जाधव यांनाही निमंत्रीत करण्यात आलेले आहे.



खा.बजरंग सोनवणे यांनी लोकसभा निवडणूकीत विजयी झाल्यानंतर तातडीने बीड-अहिल्यानगर रेल्वेप्रश्नी लक्ष घातलेले आहे. या शिवाय मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणी सर्वप्रथम आवाज उठविला होता. अगदी संसदेत सुध्दा त्यांनी हा विषय पोटतिडकीने आणि माणूसकीच्या नात्याने मांडून महाराष्ट्रासह देशभरातील नागरिकांचे लक्ष वेधून घेतले होते. याच कारणाने महाराष्ट्रासह परदेशातील भारतीय नागरिकांमध्ये खा.बजरंग सोनवणे यांची क्रेझ निर्माण झाली आहे. दि.२३ फेब्रुवारी रोजी अबुधाबी येथे होत असलेल्या शिवजयंती कार्यक्रमास ते उपस्थित राहून भारतीय नागरिक आणि शिवप्रेमींशी ते संवाद साधणार आहेत. बीडचे खा.बजरंग सोनवणे हे अबुधाबीला जयंतीनिमीत्त जात असल्याने ही जिल्ह्यासाठी गौरवाची बाब आहे.

# मस्साजोगकरांचं २५ पासून आंदोलन
## जरांगेंची देशमुख कुटुंबियांना भेट,

मस्साजोग : मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी आज बीड जिल्ह्यातील मस्साजोगमध्ये जाऊन संतोष देशमुख यांच्या कुटुंबियांची भेट घेतली. संतोष देशमुख हत्या प्रकरणातील आरोपी कृष्णा आंधळे अजूनही फरार आहे. त्यामुळं त्याला लवकरात लवकर अटक व्हावी, यासाठी मस्साजोगमधील गावकरी उपोषण करणार आहेत. हा विषय संवेदनशील असल्याचे जरांगे म्हणाले. यावेळी मस्साजोग गावातूनच मनोज जरांगे पाटील यांनी जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांना फोन केला. यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी सकारात्मकता दाखवल्याचे जरांगे पाटील म्हणाले. मस्साजोगचे ग्रामस्थ येत्या २५ तारखेला उपोषण करणार आहेत. हा खूप संवेदनशील विषय आहे. निवेदन असलं नसलं तरी सहकार्य करा असे मनोज जरांगे पाटील म्हणाले. राजेश पाटील आणि प्रशांत महाजन या पोलीस अधिकाऱ्यांना सह आरोपी करा आणि त्यांची चौकशी करा असेही मनोज जरांगे पाटील म्हणाले. तसेच कृष्णा आंधळेला अटक करा. संतोष देशमुक हत्याप्रकरणात सरकारी वकील उज्वल निकम यांची नियुक्ती करा. बाकीच्या आरोपींची सीडीआर काढा, या मास्साजोगमधील गावकऱ्यांच्या आणि देशमुख कुटुंबाच्या मागण्या मनोज जरांगे पाटील यांनी जिल्हाधिकाऱ्यांना सांगितल्या

# बजरंगबली प्रतिष्ठाण आयोजित शिवजन्मोत्सव सोहळा-२०२५




सालाबादप्रमाणे याही वर्षी मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला. या प्रसंगी पंचक्रोशीतील सर्व शिवप्रेमी तसेच तरुण व जेष्ठ नागरिक यांनी मोठ्या प्रमाणात उपस्थिती दर्शविली. तसेच श्री क्षेत्र नगद नारायण गडाचे महंत ह.भ.प.शिवाजी महाराज व श्री क्षेत्र रामचंद्र महाराज संस्थान तिप्पटवाडी चे मठाधिपती ह.भ.प.महंत गुरुवर्य रामानंद महाराज भारती यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. व नंतर ४१. रक्तदात्यांनी रक्त केले व ५१ जणांनी आरोग्य शिबिराचा लाभ घेतला , रक्तदान व आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. प्रसंगी पंचक्रोशीतील सर्व शिवप्रेमी तसेच ज्येष्ठ नेते, सर्व क्षेत्रातील मान्यवर मंडळी यांनी ही आपले रक्तदान करुन आपल्या सर्वांनसमोर एक राष्ट्रीय एकात्मतेचा आगळा वेगळा संदेश मांडला.

तरी या कार्यक्रमास छत्रपती संभाजी महाराज चौक मुर्शदपुर /तिप्पटवाडी फाटा येथील व्यापारी आणि पंचक्रोशीतील सर्व शिवप्रेमी तसेच बजरंगबली प्रतिष्ठाणचे सहका-यांनी मोठ्या प्रमाणात सहकार्य केले.

# शाळांना यंदा ४२ दिवस उन्हाळी सुटी!

- चालू शैक्षणिक वर्ष आता अंतिम टप्प्यात असून उन्हाळ्यास सुरवात झाली आहे. एप्रिलच्या १५ तारखेपर्यंत विद्यार्थ्यांची अंतिम सत्र परीक्षा होणार आहे. यंदा पोळ्याला सुटी दिल्याने शाळांना ३ मेपासून उन्हाळा सुटी लागणार आहे. १४ जूनपर्यंत उन्हाळा सुटी असणार आहे आणि १५ जूनपासून नव्या शैक्षणिक वर्षाची सुरवात होणार आहे. शाळांना वर्षात ७६ सार्वजनिक सुट्या असतात. याशिवाय प्रत्येक महिन्यातील चार रविवार एकत्रित करुन ३६५ दिवसात शाळांना १२४ दिवस सुट्या असतात. उन्हाळा सुरु




झाल्याने शाळांमधील विद्यार्थी आतापासूनच मामाला गावाला जाण्याचे स्वप्न रंगवू लागले आहेत. तत्पूर्वी, २०२४-२५ या शैक्षणिक वर्षातील अंतिम सत्र परीक्षा एप्रिलच्या पहिल्या आठवड्यात सुरु होऊन दुसऱ्या आठवड्यात संपेल, असे शाळांनी नियोजन केले आहे. १ मे रोजी परीक्षेचा निकाल जाहीर होईल आणि त्यानंतर दोन दिवस शिक्षकांना शाळेत यावे लागणार आहे. ३ मेपासून शाळांना उन्हाळा सुटी असणार आहे. अनुत्तीर्ण पाचवी-आठवीच्या विद्यार्थ्यांची जुलैत फेरपरीक्षा पाचवी व आठवीच्या विद्यार्थ्यांना ढकलपास पद्धत आता बंद झाली आहे. अंतिम सत्र परीक्षेत अनुत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांची फेरपरीक्षा जुलैमध्ये घेतली जाणार आहे. त्यात पास होणारे विद्यार्थी पुढील वर्गातील प्रवेशासाठी पात्र ठरतील. जुलैच्या फेरपरीक्षेतही अनुत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना आहे त्याच वर्गात बसावे लागणार आहे. या विद्यार्थ्यांचे पेपर शिक्षणाधिकारी कधीही पडताळून पाहू शकतात. त्यामुळे पाचवी व आठवीच्या विद्यार्थ्यांचे पेपर शाळांना जपून ठेवावे लागणार आहेत.

# शेतकरी बांधवांनो, पीएम किसानची ई-केवायसी करा
## गेवराई तालुका कृषी अधिकारी अश्विनी मस्के यांचे आवाहन

गेवराई : प्रतिनिधी

पंतप्रधान किसान सन्मान निधी योजनेंतर्गत अनेक शेतकऱ्यांचे अद्यापही ई केवायसी झालेली नाही. ते शेतकरी आगामी १९ व्या पीएम किसान सन्मान निधी योजनेच्या हप्त्याला मुकण्याची शक्यता आहे. त्यामुळे संबंधित शेतकऱ्यांनी आपले सरकार सेवा केंद्रात जाऊन ई-केवायसी करून घेण्याचे आवाहन गेवराई तालुका प्रभारी कृषी अधिकारी अश्विनी मस्के यांनी केले आहे.

प्रधानमंत्री किमान सन्मान निधी योजनेचा १९ वा हप्ता दि.२४ फेब्रुवारी रोजी शेतकऱ्यांच्या खात्यात पडणार आहे. दरम्यान गेवराई तालुक्यातील जे शेतकरी इन-एक्टिव्ह झाले होते, त्यामधील काही शेतकरी यांचे पीएम किसान योजनेचे खाते हे ॲक्टिव्ह झाले आहे. त्यामुळे ज्या शेतकऱ्यांची खाते ॲक्टिव्ह झाले आहेत, त्यांनी गावातील नजीकच्या सेतु सुविधा केंद्रावर जाऊन ई-केवायसी करावी, किंवा आपले गावाचे कृषी सहाय्यक किंवा तालुका कृषी अधिकारी कार्यालयातील संबंधित कक्षामध्ये जाऊन माहिती घ्यावी. शेतकरी




सन्मान निधी योजने अंतर्गत काही शेतकऱ्याना तांत्रिक अडचणीमुळे पैसे जमा होत नसतील तर त्यांनी देखील आपली ई-केवायसी करावी. ई-केवायसी साठी त्यांना आपले कृषि सहाय्यक, कृषि पर्यवेक्षक, तालुका कृषी अधिकारी कार्यालय, नजीकच्या सेतु सुविधा केंद्र यांच्याशी संपर्क साधावा, ज्या शेतकऱ्यांचे बँक खाते आधारशी लिंक नाही त्यांनी बँकेत एन.पि.सी.आय. सेंडिंग करून घ्यावे. त्याचबरोबर ज्या शेतकऱ्यांचे लँड सेंडिंग नाही त्यांनी तहसील कार्यालयाशी संपर्क करून तेथे लँड सेंडिंग करून घ्यावी. या बाचतीत काही अडचण असल्यास तालुका कृषी अधिकारी कार्यालयच्या सांख्यकी विभागाशी संपर्क साधावा, असे आवाहन गेवराई तालुका प्रभारी कृषी अधिकारी अश्विनी मस्के यांनी केले आहे.

### शेतकऱ्यांनी अशाप्रकारे ई-केवायसी करावी!

ज्या शेतकन्यांकडून वेळेमध्ये ई-केवायसी अपडेट आणि आधार सिडींग केले जाणार नाही, अशा शेतकऱ्यांना भविष्यामध्ये पीएम किसान योजनेच्या लाभापासून वंचित राहावे लागण्याची किंवा अपात्र ठरण्याची शक्यता निर्माण होते. त्यामुळे पहिल्यांदा पीएम किसान ाझ्ळिरप.र्सें.ळप च्या अधिकृत वेबसाइटवर जा. त्यानंतर मुख्यपृष्ठावरील ई-केवायसी पर्यायावर क्लिक करा. त्यात तुमचा आधार कार्ड नंबर आणि कॅप्चा कोड टाका. त्यानंतर सर्च पर्यायावर क्लिक करा. त्यानंतर आधारशी लिंक केलेला मोबाईल नंबर टाका. मोबाईल नंबरवर आलेला जढझ प्रविष्ट करा. सबमिट पर्यायावर क्लिक करा. अशा पद्धतीने तुमची केवायसी प्रक्रिया पूर्ण होईल, असे देखील आवाहन तालुका कृषी अधिकारी अश्विनी मस्के यांनी केले आहे.

संपादकीय

## थोडा अंधार हवा आहे

डोह थोडा अंधार हवा आहे हल्ली सगळ्यात मोठा प्रॉब्लेम कुठला असेल तर तो म्हणजे कधी अंधारच होत नाही. सगळीकडे इन्व्हर्टर असतात आणि अगदीच नसले तरी लोकं दुसऱ्या सेकंदाला मोबाईलचा लाईट लावतात आणि अंधार घालवतात. त्यामुळे दुसऱ्या क्षणी तुम्हाला तुमच्या पुढचं , आजूबाजूचं दिसू लागत. पण तिथेच खरा प्रॉब्लेम आहे.मला आठवतं आहे , आमच्या लहानपणी इन्व्हर्टर , मोबाईल नव्हते. मेणबत्त्या , कंदील हे ऑपशन्स होते. पण कधी रात्री लाईट गेले तर दुसऱ्या सेकंदाला आजीचा आवाज यायचा. ङ्गकोणीही जागचे हलू नका. आहे त्या जागेवर बसून आपापले डोळे २ मिनिटे घट्ट बंद करा आणि आम्ही डोळे घट्ट मिटायचो. मग २ मिनिटांनी आजीचा आवाज यायचा ..आता हळूहळू डोळे उघडा आणि आपोआप अंधारात दिसू लागेल. आणि खरंच मगास पेक्षा आता थोडं दिसू लागलं असायचं. मला अजूनही याचं अप्रूप आहे. मुळात अंधारात असताना डोळे का मिटायचे, त्याने काय होणार पण डोळे मिटून उघडले की दिसू लागायचं हे खरं. मला वाटतं की जुन्या पिढीला हीच सवय होती कि अंधारात असलो की अजून घट्ट डोळे मिटून आत डोकावायचे. स्वतःचे डोह धुंडाळायचे. आपल्या जाणिवा , नेणिवाचे झरे मोकळे करायचे आणि मग वाटा स्पष्ट होतं असाव्यात / दिसत असाव्यात. आणि आपणच शोधलेली आपली वाट असेल तर मग ती सुकर होते, त्याचं ओझं होत नाही आणि त्या वाटेवरचा प्रवास समाधान देणारा असतो.माझ्या आजोबांचा पण लाईट गेले की एक आवडता डायलॉग होता. ङ्गअंधारात रस्ता दिसतो आणि उजेडात फक्त खड्डे दिसतात..दिवे येई पर्यंत तुमचे रस्ते शोधाङ्ग.. लहानपणी मला हा विनोद वाटायचा पण हल्ली आजोबा आठवतात , त्यांचं वाक्य आठवतं आणि आता कुठे त्याचा अर्थ ५० वर्षांनी थोडाफार कळतो. स्वतःच्या तरुणपणी परिसस्थितीच्या अंधारात त्यांनी कष्ट सोसले, स्वतःचेरस्ते स्वतःच शोधले .वार लावून जेवले , शिकले , नोकरी केली, आपला रस्ता शोधला . स्वतःच्या पोटाला चिमटा काढून मुलांना इंजिनिअर केलं, त्याची गोड फळं आम्ही उपभोगतोय. कधी नव्हे तर परवा खूप वेळ लाईट गेले , इन्व्हर्टर बंद पडला तर किती चिडचिड. डेटाचा स्पीड थोडा कमी झाला आणि लॅग आला तर परत त्रागा. पिझ्झा अर्ध्यातासात डिलिव्हर नाही झाला तर फ्री ची मागणी. उजेडात फक्त खड्डे दिसतात हेच खरं. पण हल्ली अंधारच होत नाही. मुळात अंधारच माहित नाही. आजूबाजूला सारखा लाईट असतो आपण तो एनलायटन करू शकत नाही आणि डोळेच कधी न मिटल्यामुळे आत डोकावायची वेळच येत नाही. इन्व्हर्टर / मोबाईल च्या लाईट ने आजूबाजूचं दिसतं आणि आजूबाजूचं दिसलं तर फक्त स्पर्धा वाढते, पण वाट काही सापडत नाही. वाट सापडायची असेल तर आत डोकावता आलं पाहिजे. आपापले डोह धुंडाळता आले पाहिजेत. अंधारात तळाशी पोहोचणं सोपं होतं असावं. म्हणून अधून मधून थोडा मिट्ट अंधार हवा आहे.स्वतः च्या डोहात डोकावून स्वतः च्या अंतचक्षूने स्वतःलाच पाहायचे आहे हा तर खरा शोध आहे नाहीतर उजेडात खड्डे दिसूनही त्यातच उडी मारताहेत लोक भावनाशून्य होवून




१) प्रितगंध फाऊंडेशन मुंबई मार्फत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वर्दे ,कुडाळ यांना शैक्षणिक साहित्य, आर्थिक मदत म खाऊ वाटप करण्यात आलेप्रितगंध फाऊंडेशन मुंबई अध्यक्ष -संतोष म्हाडेश्वर, खजिनदार सौ शिवानी म्हाडेश्वर तिवरे ग्रामस्थ निशा ,प्रणय गुरव व शिक्षक विद्यार्थी यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम दिनांक १७/फेब्रुवारी/२०२५ रोजी पार पडला... सर्व सदस्य,दाते , पालकत्व स्विकारले तसेच प्रत्यक्ष अप्रत्यक्ष मदत केली त्यांचे सर्वांचे मनःपूर्वक आभार

## मुलांच्या भावविश्वाशी समरस असणाऱ्या कविता

पुस्तकाचे नाव - मोराच्या गावाला जाऊया
कवी - प्रशांत असनारे
प्रकाशक- अष्टगंध प्रकाशन, ठाणे.
प्रकाशन वर्ष - २५ डिसेंबर २०२३
पृष्ठे - ५२
मूल्य - २०० रु.
मुखपृष्ठ- संतोष घोंगडे
समीक्षक - सचिन बेंडभर

मुलांच्या भावविश्वाशी समरस असणाऱ्या कविता

अकोला जिल्ह्यातील कवी प्रशांत असनारे हे एक संवेदनशील कवी आहेत. त्यांची आजपर्यंत अनेक पुस्तके प्रकाशित आहेत. मोराच्या गावाला जाऊया हा काव्यसंग्रह घेऊन ते बाल दोस्तांच्या भेटीला आले आहेत. नुकताच त्यांच्या या पुस्तकाला महाराष्ट्र शासनाचा राज्य पुरस्कार मिळाला आहे. ही एक विशेष आनंददायी बाब आहे.

लहान मुलांच्या वयोगटाला अनुसरून तयार केलेल्या या कविता मुलांची मनोरंजन तर करतातच शिवाय त्यांना वेगळ्या विश्वात घेऊन जाऊन साहित्य सौंदर्याची अनुभूती देतात. इतक्या या कविता सुंदर आणि साजेशा झालेल्या आहेत. फुलपाखरू, गाव, चित्र, पशुपक्षी, फुले, झाड आणि मोर अशाप्रकारे मुलांच्या वयोगटाला अनुसरून विषय घेऊन त्यावर सुंदर कविता त्यांनी तयार केलेल्या आहेत. प्रत्येक कवितेचा वेगळा विषय असून ती कविता मुलांना एका वेगळ्याच विश्वात घेऊन जाते. कविता वाचल्यावर वाचक अंतर्मुख होऊन त्यावर विचार करू लागतो. अशाप्रकारे प्रत्येक कवितेचे वेगळेपण कवीने सहजगत्या अलगत टिपले आहे. त्याला वास्तवतेची किनारा असून कुठेही कल्पनेचा अवास्तव पिसारा कवीने फुलवला नाही.

आनंदऋतू या पहिल्याच कवितेने या काव्यसंग्रहाची सुरुवात होते. वाचकाला अंतर्मुख करायला लावणाऱ्या या कवितेत कवी म्हणतो,

बाहेर किती असलं
रखरखत ऊन
तरी आपण आपल्या आत
खूप आत खोलवर
झाडांच्या सावलीत बसाव




बाहेर कितीही असला
मुसळधार पाऊस
तरी आपण आतल्या आत
खूप आत खोलवर
हातात छत्री घेऊन चालावं

अशा सुंदर कवितेचा शेवट करताना कवी म्हणतो,
थोडक्यात,
बाहेर कोणताही असला
मौसम किंवा हंगाम
तरी आपण आपल्या आत
खूप आत खोलवर
आपलाच ऋतू पेरावा
तोच असतो खरा ऋतू
तोच असतो आनंदऋतू!

अशाप्रकारे माणूस बाहेर कितीही संकट यांनी घेतला तरी आपल्या मनातला ऋतू मात्र कायम बहारदार ठेवावा असे या ठिकाणी कवी म्हणतो. या ऋतुनी आपल्याला जीवन जगण्याची नवी दृष्टी तर मिळतेच शिवाय अडचणींवर मात करण्यासाठी प्रेरणा मिळते.

नवे गाव या कवितेत संकटे आलेल्या मुलाला संकटात न डगमगता चालत राहण्याचा सल्ला कवींनी या ठिकाणी दिला आहे. रात्री मागून दिवस येतो, उन्हाळ्यानंतर पावसाळा येतो तसेच वाईट दिवसानंतरही चांगले दिवसही येतातच..! पण त्यासाठी लागते धैर्य धाडस आणि संयम. अडचणीच्या काळात जो टिकला तोच शिकला. परिस्थिती नेहमीच सारखी राहत नाही ती बदलत राहते, एखाद्या ऋतू सारखी. परंतु तोपर्यंत आपल्या संयम हवा. अगदी कठीण काळात चिकाटीने मार्गक्रमण करावे तेव्हा यशाचे शिखर नक्की गाठता येते हे कवी या ठिकाणी आवर्जून सांगू इच्छितो.

हे सांगताना तो आपल्या नवे गाव या कवितेत म्हणतो,
मुला, मान्य आहे
समोर धुके आहे अन मागे अंधार

पण तरीही तू इथे थांबू नकोस
इथल्या झाडांना टेकू नकोस

संकटांना धीर देत कवी बाल दोस्ताना शेवटी सकारात्मक ऊर्जा देत म्हणतो,
माझी खात्री आहे
जेव्हा हे धुकं विरघळून जाईल
तू एका नव्या गावात असशील

अशाप्रकारे येणाऱ्या संकटांना न डगमगता त्यांचा सामना करण्याचा अनमोल सल्ला कवी या ठिकाणी आपल्या बाल दोस्तांना देतो.

फुलपाखरू कवितेत एक लहानसा मुलगा फुलपाखरू पकडण्याचा प्रयत्न करतो परंतु ते त्याच्या हाताला लागत नाही तेव्हा तो थकतो व गाल फुगून बसतो तेव्हा त्याच्या फुगलेल्या गालावर गुलाबी फुल समजून एक भिरभिरणारे फुलपाखरू अलगद येऊन बसते. ही कविता वाचताना थोरामोठ्यानाही आनंद वाटतो. कवीने केलेली कल्पना खूपच सुंदर असून निरागस बालकाचे भाव यात अचूकपणे टिपलेले आहेत.

सर्वच कविता वाचनीय असून त्या मुलांच्या भाविश्वानुसार तयार केलेल्या आहेत. विद्यार्थ्यांना आत्मविश्वास, धैर्य आणि चिकाटीचा संदेश देणाऱ्या या कविता सकारात्मक ऊर्जेने भरलेल्या आहेत. साधी सोपी भाषा शैली व आकर्षक रंगीत चित्रांमुळे या कविता मुलांशी संवाद साधतात. त्यांच्यात लढण्यासाठी आत्मबळ निर्माण करतात. इतक्या या कविता स्वयंपूर्ण व प्रेरक आहेत. त्या वाचल्यानंतर विद्यार्थी आत्मनिर्भर बनतो व येणाऱ्या प्रत्येक संकटांचा सामना करण्यासाठी तो सज्ज होतो.

ठाणे येथील माननीय श्री. संजय शिंदे यांच्या नावाजलेल्या अष्टगंध प्रकाशनने या पुस्तकाची साजेशी बांधणी केली आहे. पुस्तकाची गुणवत्ता आणि पानांचा दर्जा त्यांनी अतिशय चांगल्या पद्धतीने ठेवलेला आहे. पुस्तक हातात घेताच ते वाचकाला आकर्षित करते. संतोष घोंगडे, यांनी विषयाला अनुरूप काढलेले आकर्षक मुखपृष्ठ व आतील चित्रे पुस्तकाच्या उंचीत मोलाची भर टाकते. प्रशांत असनारे यांना पुढील साहित्यिक वाटचालीसाठी मनापासून हार्दिक शुभेच्छा..!

-----------------------------------
-----

सचिन बेंडभर
कार्यकारणी सदस्य,
अखिल भारतीय मराठी बालकुमार साहित्य संस्था, पुणे.

## डॉ.मधुसूदन घाणेकर यांना राजकपूर जन्मशताब्दी पुरस्कार प्रदान

पुणे :१९.०२.२०२५ आंतरराष्ट्रीय कीर्तिचे,कलावंत, शीळवादक, गायक, अभिनेते डॉ.मधुसूदन घाणेकर यांना नुकताच श्रीदा क्रिएशन आणि सॅम फिल्म इंटरनॅशनल या दोन संस्थांनी स्वतंत्ररित्या राजकपूर जन्मशताब्दी पुरस्काराने जाहिररित्या सन्मानीत केले.ङ्क १९६३ पासून शीळवादन, १९६५ पासून चित्रपट गीतांचे सादरीकरण, लघुपट, अनुबोधपट, देशविदेशातील गेली ६ दशके एकपात्री.कार्यक्रम आदि विविध पातळीवर डॉ.मधुसूदन घाणेकर यांनी केलेले विश्वविक्रमांनी डॉ.घाणेकर यांचा सुवर्णयुगाचाच काळ घडत आहे.त्यांचे हे योगदान रसिकांना नक्कीच प्रेरणादायी आहे ङ्ग असे गौरवोद्गार श्रीदा क्रिएशन संस्थेच्या संस्थापक, अध्यक्ष आणि अभिनेत्री प्रिया दामले यांनी डॉ.घाणेकर यांना पुरस्कार प्रदान करताना काढले. ङ्ग डॉ.मधुसूदन घाणेकर यांनी आत्तापर्यंत निर्मिती



केलेल्या लघुपटांसाठी संकल्पना,कथा,पटकथा, संवाद,दिग्दर्शन, प्रमुख भूमिका , गीत, संगीत, गायन, नेपथ्य ,कला दिग्दर्शन आदि अनेक जबाबदा-या स्वतः यशस्वीरित्या पार पाडतात. शीळवादन तर त्यांची खासीयतच असते. असे बहुआयामी,निगर्वी आणि स्वतःबरोबर दुस-यांना बरोबर घेऊन जाणारे हरहुनूनरी , आनंदी व्यक्तिमत्व दुर्मिळच ङ्ग असे प्रतिपादन सॅम फिल्म इंटरनॅशनलच्या अध्यक्ष आणि अभिनेत्री डॉ.समता कुलकर्णी यांनी डॉ.घाणेकर यांना पुरस्कार प्रदान करताना केले. महिला सन्मान.च्या उपाध्यक्ष मधुकर्णिका सारिका सासवडे यांनी प्रास्ताविक केले. याच सोहळ्यात डॉ.मधुसूदन घाणेकर लिखित म दिवाना मुझको लोग कहे म हे राजकपूर यांच्या चित्रपट कारकिर्दीविषयक पुस्तक तसेच डॉ.घाणेकर संपादित ६४६ व्या विश्वविक्रमी डहाळी.अंकाचे प्रकाशन मान्यवरांच्या शुभहस्ते करण्यात आले. डॉ.मधुसूदन घाणेकर यांनी राजकपूर यांच्या चित्रपट क्षेत्रातील कारकिर्दीवर प्रकाशझोत टाकत राजकपूर यांची काही गाणी सादर करुन उपस्थितांची मने जिंकली. भेटेल त्या व्यक्तीला आनंद द्या हे राजकपूर यांच्या भूमिकांवरुन निश्चित बोध होतो असे डॉ.घाणेकर यांनी सांगितले.उर्मिला आपटे, अनुपमा लिमये , श्रीनिवास तेलंग , शैलजा सोमण, आदि भारतीय जनता पार्टीचे पदाधिकारी, वसुधा इंटरनॅशनल.च्या अध्यक्ष वसुधा नाईक, कवी बाबा ठाकूर तसेच गायक गोरख भोयर, डॉ. विनोद कांबळे, दादासाहेब फाळके चित्रपट युनियनच्या जिल्हा कार्याध्यक्ष सोनिया गोळे, आणि नीला विद्वांस, माया फडके, दत्तात्रय पाटे, चंद्रकांत अवरंगे , मनोज देशपांडे, अशोक चव्हाण आदि सामाजिक क्षेत्रातील मान्यवर मंडळी कार्यक्रमास उपस्थित होती. सांजभेट संस्थेचे कार्याध्यक्ष प्रदीप शुक्ल तसेच मधुरा भागवत, अंकुश शिर्के यांनी कार्यक्रमाचे संयोजन केले. प्रिया दामले यांनी आभार मानले.

## पालवी

निसर्ग हा तीन ऋतूंचा मिळून बनलेला आहे.ऋतू हे मानवी मनाला जाणवतात.जसे पावसाळ्यात पाऊस, उन्हाळ्यात उन्हाच्या धारा आणि हिवाळ्यात थंडी जाणवते.

चैत्राचे आगमन होताच निसर्गाचे रंगढंग ही पुरते बदलतात.पानाफुलांचा हिरवा रंग कुठेतरी गायब झालेला दिसतो आणि लाल, पिवळ्या रंगाची सगळीकडेच उधळण करताना मन रंगीत करून जाते.चैत्र पालवीच्या या रंगछटा निसर्गाचे चक्र आहे.

अशी निसर्गाची अभिव्यक्ती अगदी लहान गवत ते झाडांद्वारे होते. हिवाळ्यात गळून गेलेली झाडांची पाने वसंतात विविध रंगांच्या फुलांनी वृक्ष बहरून येतो.आपल्याकडे पाऊस वर्षातून एकदाच पडतो.त्यामुळे वृक्ष पाणी व अन्न बुंध्याशी साठवून पावसाळ्यात भरपूर वाढतात.पाऊस संपला कि झाडाला पाण्याची टंचाई जाणवते.त्यामुळे पाण्याचे नियोजन ते अशाप्रकारे करतात.झाडातून पाणी बाहेर पडणे म्हणजे बाष्पीभवन होऊन पाणी उडून जाते. नेमकी याचवेळी झाडाची पाने गळून पडतात. अशावेळी झाडे शांत बसतात.त्यात थंडीचे दिवस व दुष्काळ .मग वृक्ष झोपी जातात.थंडी संपली कि वातावरणात उष्णता वाढू लागते. निसर्गाला लगेच जाग येते , आपल्याला पुढची पिढी निर्माण करायची आहे याची जाणीव होते,व लगेच बिया फेकायला सुरूवात होते. त्यासाठी फुले लागतात .कीटकांनी येऊन परागीकरण करायला हवे ,अशी जाणीव झाली कि वृक्ष खाड्कन जागे होतात व कसलीही भीती न बाळगता फुलांची उधळण करतात.रानात सफेद व सोनचाफा, पळस ,धोत्रा अशी विविध रंगांची फुले बहरून येतात.

जितक्या वेगाने ही फुले येतात त्याच वेगाने जातात ही...पाहता पाहता उन्हात खडखडीत वाळतात, किती क्षणभंगुर ना.....!

चैत्राची चाहूल लागताच निसर्गाचे चित्रंच पालटते.पण यावेळी हे रंग फुलांचे नसून पार्वतीचे असतात.फुले ही शोभिवंत असतातच, पण पर्णाचे रंग निसर्गात मनोरम दृश्य पसरवतात.चैत्रातील मजा ही पर्ण शोभेची असते. या पालवीत ही फुलांएवढे वैविध्य असते.रंग सांगायचेच तर लालभडक, गुलाबी ,हलका गुलाबी ,केशरी किंवा नारंगी कडे झुकलेला पोपटी,पिवळट पोपटी ,पांढरट करडा असे अनेक नयन मनोहर रंग घेऊन वृक्ष नटलेला दिसतो.



चैत्राच्या या आगमनात रंगबिरंगी चैत्रपालवी डोळ्यांना सुखावून टाकते,यात शंकाच नाही. तेव्हा रणरणत्या उन्हात झाडाच्या सावलीचा आधार घेत असू ,तर नक्कीच एक नजर झाडावर फिरवून पहा.काय माहीत नक्की कोणत्या रंगाने तुमचे स्वागत होईल.अशी ही चैत्रपालवी नेत्र सुखावून टाकते.मानवी जीवनासारखे चढ -उतार हे वृक्षाच्या जीवनात ही येतात.तेव्हा न डगमगता आयुष्याला सामोरे व्हावेच लागते. आयुष्यात एक तरी झाड नक्कीचं लावा.पर्यावरण हे संतुलित राहते.

लेखिका -अनिता प्रविण कळसकर
(एम.ए.एम.फिल.) कल्याण जिल्हा -ठाणे
मो.नं -९७६९१४००११

## रमेश पवार यांच्या समाजोपयोगी पाच पुस्तकाचे शिवजन्मोत्सव सोहळ्यात प्रकाशन

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

नांदेड : मागच्या अनेक वर्षापासून शैक्षणिक व सामाजिक चळवळीत पूर्ण वेळ स्वतःला समर्पक व निस्वार्थ भावनेतून झोकून देऊन काम करणारे स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड बहीशाल शिक्षण केंद्राचे व्याख्याते तथा मराठा सेवा संघाचे जिल्हा सचिव रमेश पवार यांनी महामानवांच्या चरित्रावर शेकडो मोफत व्याख्याने देत वेगवेगळ्या विषयासह महामानवा चरित्रावर संशोधनात्मक लेखन केले आहे. त्यांचे अनेक लेख वर्तमान पत्रातून मासिकातून प्रसिद्ध झाले आहेत.चिकित्सक, संशोधनात्मक तर्कशुद्ध विचारातून ऐतिहासिक सिद्धांतावरील उदाहरणासह वर्तमानात ही सर्व महामानवे समस्त मानवांसाठी कशी प्रेरक आहेत. हे विविध लेखाच्या माध्यमातून ङ्गप्रेरक महामानवङ्क शब्दबद्ध केलेला आहे. विद्यार्थी व तरुणाईला प्रभावीपणे भाषण करता यावे म्हणून प्रभावी भाषण एक कला हे पुस्तक लिहीले असून विद्यार्थी, पालक व समाजाला दिशा दाखवणारे प्रेरक महामानव, प्रभावी भाषण एक कला,पर्यावरण शिक्षण भविष्याची गरज, विद्यार्थी आणि व्यक्तिमत्व विकास, अभ्यास कसा करावा? अशा पाच पुस्तकाचे प्रकाशन मराठा सेवा संघ, संभाजी ब्रिगेड ,जिजाऊ ब्रिगेड व ३२ कक्ष नांदेड




आयोजित सार्वजनिक शिवजन्मोत्सव सोहळ्यात महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण,माजी खासदार तथा आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर,नांदेडचे खासदार रविंद्र पाटील चव्हाण, माजी उच्च व तंत्र शिक्षण राज्यमंत्री डी. पी.सावंत, माजी आमदार मोहनअण्णा हंबर्डे, मराठा समाज भूषण माधवराव पाटील शेळगावकर,कॉंग्रेस कमिटीचे जिल्हाध्यक्ष बी.आर.कदम, उद्योगपती मारोतराव पाटील कवळे, माजी सनदी अधिकारी अनिल मोरे, राज्याचे पूर्व शिक्षण संचालक डॉ. गोविंद नांदेडे, डॉ, रेखाताई चव्हाण, माजी महापौर जयश्रीताई पावडे, इंजि तानाजी हुस्सेकर, प्रा. संतोष देवराये,माजी सभापती संजय पाटील शेळगावकर, नानाराव कल्याणकर, उध्दवराव सुर्यवंशी, डॉ. सुनील कदम आदी मान्यवरांच्या हस्ते झाले. मराठा सेवा संघाची शिकवण लिहीते व्हा,बोलते व्हा..! अशी आहे. लेखनासाठी प्रेरणा युगनायक अॅड. पुरुषोत्तम खेडेकर यांच्यामुळे मिळाली ही पाच पुस्तके वाचक वर्गांच्या हाती देताना मनस्वी आनंद होत आहे. सर्व चोखंदळ वाचकवर्ग या पुस्तकाचे स्वागत करेल अशी भावना लेखक रमेश पवार यांनी व्यक्त केली. अत्यंत समाजोपयोगी या पाच पुस्तकाचे प्रकाशन झाल्याबद्दल लेखकाचे मराठा सेवा संघाचे जेष्ठ मार्गदर्शक मधुकरराव देशमुख,राष्ट्रीय अध्यक्ष कामाजीराव पवार,इंजि शे.रा.पाटील, पूर्व शिक्षणाधिकारी शिवाजीराव खुडे,डॉ. सोपानराव क्षिरसागर, प्रा.डॉ.पंजाबराव चव्हाण, प्रा. संतोष देवराये, इंजि शिवाजीराजे पाटील, इंजि तानाजी हुस्सेकर, पूर्व शिक्षण संचालक डॉ.गोविंद नांदेडे,पूर्व अति. मु.का. अ.शिवाजीराव कपाळे, प्रा.डॉ.हनुमंत भोपाळे, नानाराव कल्याणकर उध्दवराव सुर्यवंशी, भगवानराव ताटे,शिवाजी पाटील आलेगावकर, शिवा कांबळे,पंडीत पवळे, व्यंकटराव जाधव, माजी जिल्हाध्यक्ष पंडीतराव कदम चिखलीकर भंडारा जिल्हा परिषदेचे शिक्षणाधिकारी रविंद्र सोनटक्के,नांदेड जिल्हापरिषदेचे प्राथमिक शिक्षणाधिकारी डॉ.सविता बिरगे,गटशिक्षणाधिकारी सतिश व्यवहारे, देविदासराव बस्वदे, अशोक पाटील, सुधाकर थडके, बंडु पाटील,संकेत पाटील,परमेश्वर पाटील, सुभाष कोल्हे,बालाजी सिरसाट,कृष्णाताई मंगनाळे, सुरेखाताई रावणगावकर,अरूणाताई जाधव,डॉ विद्याताई पाटील, सुमित्राताई वडजकर, कल्पनाताई चव्हाण,अर्चनाताई होगे,वनिताताई देवसरकर आदींनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

## दैनिक लोकमत शायर कवी मंचचे कवी, अहमद पिरनसाहब शेख संत गाडगे महाराज साहित्यरत्न पुरस्काराने सन्मानित

**दैनिक लोकमत शायर कवी मंचचे कवी,ग्रामीण मुस्लिम साहित्य संस्थेचे हिंगोली जिल्हाध्यक्ष, (संस्थापक,शफी बोल्डेकर.)**

**अखिल भारतीय चित्रपट संघटना हिंगोली जिल्हा अध्यक्ष. (संस्थापक बच्चूभाऊ कडू.)**



श्री छत्रपती शिवाजी महाराज व संत गाडगे महाराज यांच्या जयंती निमित्त दि.१९/२/२०२५ श्री नवनाथ युवा मंडळ निमगाव वाघा, ता. जि. अहमदनगर च्या वतीने,कवी अहमद पिरनसाहब शेख, वसमत जिल्हा हिंगोली.
यांना राज्यस्तरीय ङ्गसंत गाडगे महाराज साहित्यरत्न पुरस्कार २०२५,मा. खासदार श्री निलेशजी लंकेश अहमदनगर यांच्या शुभहस्ते फेटा, सन्मानपत्र, ट्रॉफी, देऊन सन्मानित करण्यात आले.यापूर्वी अहमद शेख यांना, अखिल भारतीय झुंजवादी काव्य संमेलन २०१८ नांदेडचा,राज्यस्तरीय महादा काव्य पुरस्कार,राज्यस्तरीय काव्य प्रतिभा पुरस्कार श्रीराम पूर, राज्यस्तरीय साहित्यरत्न पुरस्कार अहमदनगर साहित्यरत्न सहानुभूती गौरव पुरस्कार पनवेल मुंबई, अशाप्रकारे अनेक काव्य संमेलनात त्यांना सन्मानित करण्यात आले,चित्रपटकथा,नाटक कवितासंग्रह(प्रतिनिधिक) गण, गवळण, पद, पोवाडे कविता, भावगीते, लोकगीते, चित्रपटगीते अशा प्रकारे श्री शेख अहमद आपल्या लिखाणातून मनोरंजन व प्रबोधन करीत असतात. म्हणून त्यांना महाराष्ट्रीतील नामांकित संस्था, नियोजक, आयोजक संस्थापक, सामाजिक कार्यकर्ते, सहकारी जेष्ठ कवी मित्र, आग्रहाने निमंत्रित करून सन्मान देतात, म्हणून अहमद शेख यांनी त्यांच्या निस्वार्थी प्रेमाला सप्रेम प्रणाम करून खूप खूप हार्दिक आभार मानले आहे

दैनिक लोकआरंभ
लोकक्रांतीचा आरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
शनिवार २२ फेब्रुवारी २०२५
https://lokaarambh.com



# श्री शिवाजी माध्य.आश्रमशाळा अंचरवाडीत शिव जयंती साजरी.



शिवजयंती च्या पावन पर्वावर दि. १९ फेब्रुवारी बुधवारी रोजी अंचरवाडी येथे उपस्थित मान्यवर व गावकरी यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी केली .व प्रतिमा पुजन केले . यावेळी शिक्षक वृंद आणि विद्यार्थी हजर होते .श्री शिवाजी माध्यमिक आश्रम शाळा अंचरवाडी येथे छत्रपती शिवराय यांना अभिवादन करण्यास व प्रतिमा पूजन करण्यास आश्रम शाळेचे मुख्याध्यापक श्री एस. डब्ल्यु चव्हाण यांनी शिव जयंती चे औचित्य साधून सकाळीच शिव प्रतिमा पूजन केले . या वेळी इंडियन पोलीस मित्र मंडळाचे जिल्हा अध्यक्ष समय कुमार जाधव यांच्या प्रमुख उपस्थितीत शिव जयंती सोहळा साजरा करण्यात आला . यावेळी त्यांनी छत्रपती शिवराय यांच्या जिवन चरित्रावर प्रकाश टाकला . उपस्थित शिक्षक वृंद यांनी . सुद्धा प्रतिमापूजन केले . त्यामध्ये आश्रम शाळेचे शिक्षक प्रशांत राठोड, एस .डी . चव्हाण सर एन पी राठोड, विखार सर, तसेच मयुर बुंदे, सह कर्मचारी बबन राठोड, भागवत जवंजाळ कैलाश जवंजाळ, ओ डी इंगळे,शालूबाई बोंडे, हरि गव्हाळे आदी उपस्थित होते .



देशातील मुलींची पहिली शाळा काव्य जागर आभियान अंतर्गत भिडेवाडाकार विजय वडवेराव आयोजित घराघरात शिवजयंती मनामनांत शिवजयंती या उपक्रमात अखंड हिंदुस्थानचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.सोबत क्रांती सूर्य महात्मा ज्योतिराव फुले यांना ही अभिवादन करण्यात आले.क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिराव फुले यांनी १८६९ साली छत्रपती शिवाजी महाराजांची समाधी शोधून त्यावर फुले अर्पण केली होती.पहिली शिवजयंती महात्मा फ ुले यांनी साजरी केली .त्यामुळे या वर्षी घराघरात शिवजयंती मनामनात शिवजयंती उपक्रमाच्या माध्यमातून कवयित्री लेखिका सरिता म्हेत्रे कलढोणे यांनी घरात शिवजयंती साजरी केली.त्यामुळे एक नवीन पर्वाची सुरवात यानिमित्ताने आदरणीय वडवेराव सरांच्या मार्गदर्शना खाली केली आहे.

# अंजली दमानिया यांचे मंत्रिमंडळ मान्यता नसल्याचे आरोप खोटेच!



: स्प्रे पंप, सोलर लाईट ट्रॅप इत्यादी वस्तू खरेदी करण्यासंदर्भात धनंजय मुंडे यांनी पत्र देऊन जीआर काढायला लावला, मंत्रिमंडळ बैठकीत त्याआधी कोणताही निर्णय झाला नव्हता, अंजली दमानिया यांनी केलेला हा दावा संपूर्णपणे चुकीचा आणि खोटा आहे. अंजली दमानिया ह्या सुरुवातीपासून अर्धवट ज्ञानाच्या आणि अपुऱ्या माहितीच्या आधारे चुकीचे व खोटे आरोप करून मीडिया ट्रायल चालवत आहेत, असे धनंजय मुंडे यांनी म्हटले असून अंजली दमानिया यांच्या आरोपांचे त्यांनी खंडन केले आहे. श्रीमती सुजाता सैनिक, मुख्य सचिव तथा मंत्रिमंडळ सचिव यांनी दिनांक ३० सप्टेंबर २०२४ रोजी माननीय मुख्यमंत्री महोदयांची मान्यता झाल्यानंतर दिनांक २३ सप्टेंबर २०२४ रोजी च्या मंत्रिमंडळ बैठकीचे इतिवृत्त निर्गमित केलेले आहे. त्यामध्ये कृषी विभागाच्या खरेदी व थेट पुरवठ्याला मान्यता देण्यात आलेली आहे. याबाबतची खरी कागदपत्रे आता समोर आली आहेत. ज्याला अंजली दमानिया बिना तारखेचे सही केलेले पत्र म्हणतात ते वास्तविकतः मंत्री कृषी यांनी आपल्या विभागाच्या सचिवांना निर्गमित केलेले टिपण आहे. टिपणावर दिनांक टाकण्याचा प्रघात नाही, तथापि सदर टिपणावर ते ज्याला मार्क केलेले आहे, त्याची स्वाक्षरी व त्याला प्राप्त झाल्याचा व कार्यासनात प्राप्त झाल्याचा दिनांक नमूद असतो. हा कार्यालयीन प्रक्रियेचा भाग आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे या शासन निर्णयान्वये व मंत्रिमंडळ निर्णयान्वये मान्यता प्राप्त झालेली खरेदी अद्यापही झालेली नाही. त्याची प्रक्रिया सुरू आहे. मंत्रिमंडळ बैठकीत झालेल्या निर्णयाच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही तातडीने करण्यासंदर्भात विभागाला टिपणाद्वारे अथवा इतर प्रकारे निर्देश देण्याचे अधिकार भारतीय राज्यघटनेच्या कलम १६६ खाली बनविण्यात आलेल्या कार्य नियमावलीतील तरतुदीनुसार संबंधित मंत्र्यांना आहेत. दमानिया ताई यांनी अर्धवट कागदपत्रांच्या आधारे जे खोटे आरोप केलेले आहेत ते संपूर्णतः खोटे आहेत, फक्त मीडिया ट्रायल करून माझी बदनामी करण्यासाठी आहेत, असेही धनंजय मुंडे यांनी स्पष्ट केले आहे. या संदर्भात आम्ही खोटी कागदपत्रे तयार केल्याची त्यांना खात्री असेल तर त्या प्रकारची रीतसर तक्रार त्यांना योग्य त्या मंचावर, प्राधिकरणाकडे नोंदविण्याची मुभा आहे, पण त्या तसे करणार नाहीत, कारण त्यांना फक्त बदनामी करायची आहे. यासंदर्भात त्यांनी जाणीवपूर्वक केलेल्या बदनामीकारक बाबींबद्दल त्यांचे विरुद्ध फौजदारी याचिका दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे,

# आधारभूत किंमत खरेदी योजनेत तूर खरेदीसाठी ऑनलाईन नोंदणी सुरु

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

नांदेड : किमान आधारभूत किंमत खरेदी योजने अंतर्गत खरीप हंगाम २०२४-२५ मध्ये तुर खरेदीसाठी ऑनलाईन नोंदणी सुरु झाली आहे. तरी शेतक-यांनी चालू हंगामातील तुर या पिकाचा ऑनलाईन पिकपेरा नोंद असलेला सातबारा उतारा, आधारकार्ड व बँक पासबूक ई. कागदपत्रके सबंधित तालुक्यातील खरेदी केंद्रावर देऊन तूर खरेदीसाठी ऑनलाईन नोंदणी करावी, असे आवाहन जिल्हा पणन अधिकारी राजेश हेमके यांनी केले आहे.



केंद्र शासनाचे किमान आधारभूत किंमत खरेदी योजने अंतर्गत एन.सी.सी.एफ च्यावतीने नांदेड जिल्ह्यात खरीप हंगाम २०२४-२५ मध्ये हमीभावाने तुर खरेदीसाठी दिनांक २४ जानेवारी २०२५ पासून ऑनलाईन पोर्टलवर नोंदणी करण्यासाठी पुढीलप्रमाणे एकूण २१ खरेदी केंद्र निश्चित करण्यात आले आहेत. प्रत्यक्षात तुर खरेदी १३ फ ेब्रुवारी २०२४ पासून सुरू झालेली आहे.मुखेड तालुक खरेदी विक्री संघ मुखेड, हदगाव तालुका खरेदी विक्री संघ हदगाव, लोहा तालुका खरेदी विक्री संघ लोहा, कृषि उत्पन्न बाजार समिती किनवट, तालुका खरेदी विक्री संघ बिलोली (कासराळी), पंडित दीनदयाल उपाध्याय अभिनव सह. संस्था देगलूर, मृष्णेश्वर फार्मर प्रोड्यूसर कंपनी लि. धनज (ता. मुखेड), सिद्राम फार्मर प्रोड्यूसर कंपनी लि. बेटमोगरा (ता. म ुखेड), किनवट तालुका कृषिमाल प्रक्रिया सह. संस्था गणेशपूर (ता. किनवट), तिरुपति शहापूर फार्मर प्रोड्यूसर कंपनी लि. वन्नाळी (ता. देगलूर), राधामाई फार्मर प्रोड्यूसर कंपनी लि. रातोळी, (ता. नायगाव), अष्टविनायक शेतीमाल खरेदी विक्री सह. संस्था मानवाडी फाटा (ता. हदगाव), श्रीजगदंब फार्मर प्रोड्यूसर कंपनी लि. जांब (बु) (ता. मुखेड), नांदेड जिल्हा फळे व भाजीपाला सह खरेदी विक्री संस्था नांदेड (ता. अर्धापूर) , कुंडलवाडी विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी कुंडलवाडी (ता. बिलोली) , बळीराम पाटील फळे व भाजीपाला प्रक्रिया सह संस्था मुखेड बेरली खुर्द (ता. मुखेड), मुखेड फळे व भाजीपाला उत्पादक सह संस्था उमरदरी (ता. मुखेड) , जय महाराष्ट्र शेतीमाल खरेदी विक्री सहकारी संस्था कौठा (ता. कंधार) , नांदेड प्रगती ॲग्रो प्रोड्यूसर कंपनी चेनापूर (ता. धर्माबाद), स्वामी विवेकानंद अभिनव सहकारी संस्था मर्या शेळगाव थडी (ता. धर्माबाद), नांदेड जिल्हा फळे व भाजीपाला सह. खरेदी विक्री संस्था नांदेड केंद्र अर्धापूर या ठिकाणी मार्के टिंग फेडरेशनमार्फत तुर ऑनलाईन शेतकरी नोंदणी सुरू झाली आहे.

# आमदार श्री राजेंद्र शामराव पाटील यड्रावकर यांच्या हस्ते पुरस्कार



सौ. किशोरी शंकर पाटील विरार बळीराजा सुखी केव्हा होणार? वैचारिक लेख द्वितीय क्रमांक कोल्हापूर जिल्हा जयसिंगपूर येथे श्री गंगाधर मुटे आयोजक शेतकरी साहित्य संम ेलनात आमदार श्री राजेंद्र शामराव पाटील यड्रावकर यांच्या हस्ते पुरस्कार दिनांक ८ ते ९ फेब्रुवारी २०२५ ला जयसिंगपूर, जिल्हा कोल्हापूर येथे पार पडलेले १२ वे अखिल भारतीय मराठी शेतकरी साहित्य संमेलन आयोजक श्रीमान गंगाधरजी मुटे स्वागताध्यक्ष म ान. आमदार श्री राजेंद्र पाटील यड्रावकर साहेब, संमेलनाध्यक्षा मान. सरोजताई काशीकर , उद्घाटक मान. ॲड. वाम नराव चटप साहेब, विशेष अतिथी मान. संजय पाटील यड्रावकर साहेब आणि संयोजक मान. ॲड. सतीश बोरुळकर साहेब. तसेच शरद कृषी महाविद्यालय यड्रावकर शिक्षण व उद्योग समूह जयसिंगपूर, कृषी क्षेत्रातील विशेष संमेलना लाभलेले सहकारी, शेती अर्थ प्रबोधिनी गंगाधर मुटे सर यांच्यासोबत हे साहित्य संमेलन म्हणजे एक विशिष्ट पातळीवर साहित्य सेवा घडावी असेच फक्त शेतकरी व शेती हा विषय घेऊन कवी संमेलन. गझल मुशायरा, शेती विषयक परिसंवाद, दृष्टी नसलेले मुंबईचे जागतिक किर्तीचे वाद्यवृंद व गायकांनी बहारदार कार्यक्रम सादर केला. ग्रंथदिंडी, लेझीम असा भरगच्च अप्रतिम कार्यक्रमात शेतकरी साहित्य संमेलन पार पडले


सौ. किशोरी शंकर पाटील विरार

# सौ. वैशाली मुन याचा साहित्य भरारी ग्रुपचा पहिल्या प्रतिनिधीक ऋणानुबंध कविता संग्रहाचे प्रकाशन

## चंद्रकांत दादा वानखेडे यांचा हस्ते मोठ्या उत्साहात प्रकाशन पार पडले

श्रीसाई प्रकाशन संस्था (चंद्रपूर) येथील प्रकाशिका सौ. वैशाली मुन याचा साहित्य भरारी ग्रुपचा पहिल्या प्रतिनिधीक ऋणानुबंध कविता संग्रहाचे पुण्यातील शनिवार वाड्यात शिवजयंतीचा पर्वावर आदरणीय जेष्ठ साहित्यिक ज्याना साहित्य क्षेत्रातील माऊली म्हणून ओळखले जाणारे चंद्रकांत दादा वानखेडे यांचा हस्ते मोठ्या उत्साहात प्रकाशन पार पडले. साहित्य भरारीतील ऋणानुबंध हा कवितासंग्रह अप्रतिम आणि दर्जेदार कविता संग्रह असून प्रत्येक कवी आणि कवयित्री ह्याचा काव्यप्रतिभा असून प्रत्येक कविता हि हृदयात स्थान निर्माण करणारी आहे. प्रत्येक साहित्यिकांचा हा अनमोल ठेवा एक नात्याची ओढ जोडून राहावी म्हणून साहित्य भरारी ग्रुपची संस्थापिका सौ. वैशाली मुन ऋणानुबंध प्रतिनिधीक कविता संग्रहाची निर्मिती केली आहे. या कविता संग्रहाचे वैशिष्ट्य म्हणजे प्रस्तावना आदर णीय कवी गुलाबराजा फुलमाळी सरांची लाभली तर रंगत आली आदरणीय कवी नितीन चंदनशिवे याचा माहेर या कवितेने सुरुवात झाली असली तर मलपृष्ठावर कौतुकाची थाप दिली ती आदरणीय जेष्ठ साहित्यिक चंद्रकांत दादा वानखेडे माऊलीने असा हा कवितासंग्रह वाचकाच्या आणि रसिकाच्या आणि साहित्यिकांचा हाती लवकरच लागणार आहे. आणि हा कवितासंग्रह प्रत्येक साहित्यिकांचा आठवणीचा ठरावा यासाठी प्रकाशिका सौ. वैशाली मुन घेतलेले प्रयत्न फलसिदधी ठरावे हिच अपेक्षा

# कवि, लेखक गीतकार, अहमद शेख, सन्मानित





जिल्हा अहमदनगर,श्रीगोंदा तालुक्यातील पिंपरी कोलंदर येथे एक महेफिल कवितांची साहित्य मंच महाराष्ट्र राज्य आयोजित काव्य संमेलन रविवार १६ २ २५ रोजी सत्यशोधक विचार मंथन आश्रम पिंपरी कोलंदर येथे ज्येष्ठ कवी गझलकार रजाक शेख यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आले,त्यात आयोजक नियोजक कवी महाबळी मिसाळ व कवी कुमोद रणदिवे यांनी परिश्रम घेतले,तर सूत्रसंचालन आनंद डोळसे सरांनी केले. या काव्य संमेलनात दैनिक गावालाचे कवी शायर मंचचे कवी अहमद पिरनसाहब शेख यांना ट्रॉफी देऊन सन्मानित करण्यात आले .

# लपलेलं पान या ओपन माईकचा पहिला प्रयोग थाटात सपन्न





काव्ययोग काव्य संस्था पुणे प्रस्तुत, लपलेलं पान या पहिल्या ओपन माईक प्रयोग थाटात संपन्न झाला.या ओपन माईक मध्ये तब्बल चाळीस कवींनी सहभाग घेतला होता.त्यात कोणी कविता,गझल,शायरी,चारोळी तर कोणी कथा सादर केली.प्रत्येक सादर करत्याला रसिक वर्गाची भर भरून दाद मिळत होती.त्यामुळे सादरीकरण करणा-याला प्रोत्साहन मिळत होते.या लपलेलं पान या पहिल्या प्रयोगाचे सूत्रसंचालन युवा गझलकार गिरीश जंगमे यांनी केले.तसेच त्यांच्या प्रत्येक गझलेतून कवींची ओळख करून देत होते.यांच्यामुळे ओपन माईकला रंगत आली.या लपलेलं पान या पहिल्या प्रयोगाचे आयोजन योगेश हरणे,गौरव पुंडे तर वसुधा नाईक यांनी केले होते.

# जनजागृती सेवा संस्थच्यावतीने डोंबिवली येथे मान्यवरांच्या उपस्थितीत शिवजंयती उत्साहात संपन्न

डोंबिवली(प्रतिनिधी-गुरुनाथ तिरपणकर)जगाच्या इतिहासात शिवजंयतीचे महत्व विशेष असेच आहे.या सोनेरी दिवसाच्या आठवणीने मनाला उभारी मिळते,तो हा सोनेरी दिवस.जगभरात शिवजंयती मोठ्या उत्साहात साजरी केली जाते. त्या अनुषंगानेच या पवित्र दिनी सामाजिक क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणा-या जनजागृती सेवा संस्थेच्यावतीने डोंबिवली पुर्व येथील शिवसेना मध्यवर्ती शाखेजवळील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला विरांगना ट्रस्टच्या फाऊंडर प्रेसिडेंट उमा सिंह,समाजसेवक,संस्थेचे जेष्ठ सदस्य-सल्लागार अरविंद सुर्वे यांच्या हस्ते शिवरायांच्या पुतळ्याला पुष्पहार



अर्पण करण्यात आला.तसेच म्युझिक मंत्रा एंटरटेन्टमेन्ट च्या संस्थापिका-संचालिका शर्मिला केसरकर,साई-श्रध्दा विविध कार्यकारी सेवा संस्थेचे संस्थापक अध्यक्ष-कैलास सणस,हिंद सेवा सामाजिक संस्थेचे अध्यक्ष जयेश दाभोळकर,संस्थेचे अध्यक्ष गुरुनाथ तिरपणकर,सह खजिनदार सौ. श्रुती उरणकर,सविता ठाकुर,आरती परब,नुतन यादव यांनी शिवरायांच्या चरणी गुलाब पुष अर्पून,नतमस्तक होत अभिवादन केले.जनजागृती सेवा संस्थेचे अध्यक्ष गुरुनाथ तिरपणकर यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला.तसेच संस्थेच्या सह खजिनदार सौ.श्रुती उरणकर यांनी प्रमुख पाहुण्या उमा सिंह,शर्मिला केसरकर यांचा संस्थेचे आभार पत्र,शाल,गुलाब पुष देऊन सत्कार केला.तसेच प्रमुख पाहुणे कैलास सणस,जयेश दाभोळकर यांचा संस्थेचे जेष्ठ सदस्य अरविंद सुर्वे यांनी संस्थेचे आभार पत्र,शाल,गुलाब पुष देऊन सत्कार केला.याप्रसंगी साई-श्रध्दा विविध कार्यकारी सेवा संस्थेचे संस्थापक अध्यक्ष कैलास सणस यांनी सर्व समावेशक,समोयचित भाषण केले. तसेच हिंद सेवा सामाजिक संस्थेचे अध्यक्ष जयेश दाभोळकर यांनीही आपले मनोगत व्यक्त केले.उपस्थित सर्व मान्यवरांनी संस्थेच्या कार्याचे कौतुक केले.या कार्यक्रमासाठी कैलास सणस यांचे विशेष सहकार्य लाभले. जय भवानी,जय शिवाजी तुतारीच्या गजरात शिवाजी महाराजांच्या जय घोषात शिवजंयती उत्साहात संपन्न झाली.शेवटी अल्पोपहाराने कार्यक्रम ाची सांगता झाली.

# उपक्रमशील शिक्षक व एनसीसी ऑफिसर श्री विश्वनाथ पांचाळ सर

## यांना राज्यस्तरी आदर्श शिक्षक पुरस्कार.

गांधी बाल मंदिर हायस्कूल मध्ये गेली ३३ वर्षे कार्यरत असून विविध शैक्षणिक उपक्रमात भाग घेऊन अनेक पारितोषिक ही मिळवलेली आहेत. लोकसंख्या शिक्षण या उपक्रमाची राज्यस्तरावर निवड झाली होती. राष्ट्रीय छात्र सेनेच्या ,(छउउ) माध्यमातून स्वच्छ भारत अभियान, साक्षरता अभियान, पर्यावरण रक्षण, तंबाखू मुक्त अभियान, हेल्मेट वाटप प्लास्टिक बंदी, कापडी पिशव्यांचा वापर , मतदार जनजागृती , स्वच्छ नदी अभियान,रस्ता सुरक्षा अभियान , संविधान दिन , स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव ,माझी माती माझा देश, युद्ध नौका भेट, कारगिल विजय दिवस असे विविध उपक्रम ातून भावी आदर्श सैनिक घडविण्याच्या प्रयत्न करीत आहे . आज अनेक कॅडेट भारतीय सैन्याचा भरती झालेले आहेत. शाळेत सहशालेय विविध चित्रकला स्पर्धा ,फलकलेखन, करोना काळातील शैक्षणिक साहित्य वाटप, किराणा वाटप, लशीकरण मोहीम,अशा





विविध सामाजिक उपक्रमाव्दारे सामाजिक बांधिलकी जपण्याचा प्रयत्न करत आहेत. ताराबाई मोडक अध्यापक विद्यालय माजी विद्यार्थी संघ आयोजित राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार सन्माननीय जयश्रीताई घैसास माजी शिक्षिका, प्रसिद्ध विनोदी अभिनेते हास्य सम्राट फेम जॉनी रावत सर , विजय





गायकवाड सर ताराबाई मोडक अध्यापक विद्यालय दादर प्राचार्य यांच्या हस्ते राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान करण्यात आला.शाळेतील सर्व शिक्षकेत्तर कर्मचारी शिक्षक , पर्यवेक्षक ,मुख्याध्यापक श्री अनिल पांचाळ सर यांनी या पुरस्काराबद्दल सरांचे अभिनंदन केले आहे.

# मुंबई खार येथे भोवते लॉ असोसिएट कार्यालयाचे उद्घाटन मोठ्या थाटात संपन्न झाले.



भारत कवितके मुंबई कांदिवली पश्चिम डॉ.(ॲड) सुनिल भोवते यांची नुकतीच केंद्र सरकारच्या विधी आणि न्याय मंत्रालयाने पब्लिक नोटरी या पदावर नियुक्ती केल्याने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती चे औचित्य साधून डॉ. आंबेडकर रोड खार मुंबई येथे ङ्गभोवते लॉ असोसिएट ङ्ग्या कार्यालयाचे उद्धघाटनआदरणीय स्टीफन नरोन्हा यांच्या शुभहस्ते करण्यात आले ,या कार्यालयांमध्ये विभागातील जनतेसाठी नवीन सेवा व सुविधा संबधित प्रत्येक आठवड्याला भरविण्यात येईल ,कायदा सहायक , कन्सुमर राइट्स ,डोमेस्टिक कोर्ट्स,करिअर चॉईस व महिला हक्क निवारण म ार्गदर्शन करण्यात येईल त्याप्रसंगी ॲड.श्रीकांत शिंदे , ॲड. मच्छिंद्र माने, ॲड. किशोर उबाळे, दिलीप गवई, अरविंद जाधव, संदीप छोवाला,पुष्पाताई शेजुळे, राजू रोडगे ,तसेच बांद्रा बार कौन्सिल असोसिएट, विक्रोली बार कौन्सिल असोसिएट, कुर्ला बार कौन्सिल असोसिएट चे जवळपास साठ सत्तर वकील, संघ आवर्जून उपस्थित होते , सूत्र संचालन संदीप पवार यांनी केले कार्यक्रम यशस्वी होण्याकरिता ॲड.. सिद्धार्थ गमरे यांनी परिश्रम घेतले, तर सर्व उपस्थितांचे आभार ॲड. कल्पना भोवते यांनी मांडले.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
शनिवार २२ फेब्रुवारी २०२५
https://lokaarambh.com


## लॉटरी विक्रेत्यांची सभा

### रोजगार वाचला, आता विक्रीचा विक्रम



मुंबई (प्रतिनिधी-गुरुनाथ तिरपणकर) लाखो लॉटरी विक्रेत्यांचा रोजगार वाचला असून आता विक्रेत्यांनीही लॉटरी विक्रीचा संकल्प करावा! असे आवाहन लॉटरी विक्रेत्यांचे जेष्ठ नेते विलास सातार्डेकर यांनी केले. त्याचे टाळ्यांचा गजरात विक्रेत्यांनी स्वागत केले. धर्मवीर लॉटरी विक्रेता सेवा संस्था ठाणे (रजि.)तर्फे व वर्षा लॉटरी एजन्सीच्या पुढाकाराने विलास सातार्डेकर यांनी लॉटरी वाचविण्याचा केलेल्या यशस्वी प्रयत्नाबद्दल सत्कार यधर्मवीर प्रवाहाचे संपादक शिवाजी कोळी यांच्या हस्ते करण्यात आला. जिल्हाध्यक्ष महेश कोळी यांनी प्रास्ताविक भाषण केले. लॉटरी संघटनेचे उपाध्यक्ष आत्माराम नाटेकर यांनी संघटनेच्या कार्याची माहिती दिली तर अंध लॉटरी विक्रेत्यांचे नेते संभाजी डोंगरे यांनीही आपले विचार मांडले विलास पुजारा आणि दिनेश पुजारा यांनीही सातार्डेकर यांच्या कार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.संघटनेने केलेल्या राज्यव्यापी आंदोलनामुळे सरकारला लॉटरी बंदीचा निर्णय मागे घ्यावा लागला हा लॉटरी विक्रेत्यांच्या एकजुटीचा विजय आहे आता आपली जबाबदारी वाढली आहे हक्कासोबत कर्तव्यही आपण सारे पार पाडूया असेही सातार्डेकर यांनी सत्काराला उत्तर देताना सांगितले. गुढीपाडवा बंपर सोबतच यापुढील सर्व लॉटरीच्या तिकीटांची सर्वाधिक विक्री करुन सरकारच्या निर्णयाचे स्वागत करुया!असेही ते म्हणाले. सरचिटणीस राजेश बोरकर, उपाध्यक्ष कमलेश विश्वकर्मा, सदस्य भावेश पवार यांनीही विक्रेत्यांशी संवाद साधला.. शेकडो विक्रेत्यांनी यावेळी लॉटरी वाचवल्याबद्दल आनंदोत्सव साजरा केला. यावेळीधर्मवीर लॉटरी विक्रेता सेवा संस्था ठाणे (रजि) अध्यक्ष दिनेश पुजारा, सचिव महेश कोळी, खजिनदार विलास पुजारा, विनोद पवार ईत्यादी उपस्थित होते.

# सुरेश धस यांचा मुंडेंवर आणखी एक गौप्यस्फोट

बीड । प्रतिनिधी भाजप आमदार सुरेश धस यांनी आष्टी येथे पत्रकार परिषद घेत पिकविमा घोटाळ्यावर भाष्य केले आहे. यावेळी त्यांनी मंत्री धनंजय मुंडे यांच्यावर पुन्हा घोटाळ्याचे आरोप केले आहेत. धनंजय मुंडे यांनी मूळ बाबी बदलून नॅनो युरिया, नॅनो डीएपीबाबत चर्चा केली असल्याचा आरोप सुरेश धस यांनी केला आहे. याबाबतचा प्रस्ताव महाविकास आघाडीचे सरकार असताना मुंडे यांनी पाठवले असल्याचेही सुरेश धस यांनी सांगितले आहे. सुरेश धस म्हणाले, ६ मार्च २०२३ रोजी धनंजय मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक बोलावण्यात आली होती. त्यात मूळ बाबी बदलून नॅनो युरिया, नॅनो डीएपीबाबत चर्चा केली. १२ मार्च रोजी तातडीने नॅनो युरिया, नॅनो डीएपीबाबत जीआर काढण्यात आला. १२ मार्चला प्रस्ताव पाठवला आणि लगेच १२ मार्च २०२३ रोजी जीआर देखील मिळाला. राज्य पुरस्कृत कापूस सोयाबीन आणि इतर धन्य उत्पादकता वाढ ही महाराष्ट्र शासनाने अर्थसंकल्पीय अधिवेशन दिनांक ११ मार्च २०२२ या दिवशी हे महाविकास आघाडीचे सरकार असताना यावेळी उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री महाराष्ट्र राज्य यांनी या योजनेची घोषणा केली. या योजनेसाठी २०२२-२३, २०२३- २४ आणि २०२४-२५ या तीन वर्षांसाठी एक हजार कोटी रुपयांची तरतूद करण्याची घोषणा केली. या योजनेत सोयाबीन व इतर गळीत पीक धान्य पद्धतीत चालना देऊन शेतकऱ्यांच्या उत्पादकतेत वाढ करणे, उत्पादकता वाढवणे, साठवणूक सुविधा, नवीन तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवणे, संरक्षण देण्यासाठी तारण योजना, हे या योजनेचे मुख्य उद्दिष्ट होते. उद्दिष्टांच्या बाबी कोणत्या ठरवल्या तर पिकांची उत्पादकता वाढ व शेतकऱ्यांची क्षमता बांधणे, त्यात प्रात्यक्षिके, शेतकरी शाळा इत्यादि. यात कापूस २५६ कोटी आणि सोयाबीन २९४ कोटी असे ५५० कोटी रुपये. बियाणे बळकटीकरण हे फक्त कृषी विद्यापीठाला देण्यासाठी कापसाला १५ कोटी, सोयबीनला ३५ कोटी म्हणजे असे ५० कोटी असे देण्यात आले. सुरेश धस यांनी धनंजय मुंडे यांच्यावर आरोप करताना म्हटले की यांनी आदल्या दिवशी अर्ज केला की लगेच दुसऱ्या दिवशी कर्ज मिळते. धनंजय मुंडे यांनी २८ मार्चला पैशांची मागणी केली आणि ३१ मार्चला त्वरित पैसे देण्यात आले. यात अनेक चुका त्यांनी करून ठेवल्या आहेत. महाराष्ट्राचे यंत्रणा महामंडळ मर्यादित यांनी देखील ७७ कोटी ८५ लाख रुपयांची आवश्यकता असल्याचे पत्र कृषी आयुक्तांना २८ मार्च रोजी पाठवले आणि कृषी ३१ मार्चला निर्गमित करून टाकले. बॅटरी अपडेटेड स्प्रे पंप याची किंमत बाजारात १५०० रुपये आहे. परंतु महामंडळाने ३४२५.६० रुपये किंमत लावलेली आहे. या बाबीमध्ये ४५ कोटींचा भ्रष्टाचार झालेला आहे. टेंडर काढताना सुद्धा अतिशय डोक्याने टेंडर काढले आहे. कोणाला काही कळू नये असे हे टेंडर त्यांनी काढले आहे. वेगळा विषय देऊन महाराष्ट्राची फसवणूक करण्याचा प्रयत्न इथे करण्यात आला आहे. दिशाभूल करण्याचा देखील त्यांनी प्रयत्न केला आहे. कृषिमंत्री धनंजय मुंडे निविष्ठा खरेदीची बाबीत बदल करून एमएआयडीसीसाठी २६४ कोटी आणि यंत्रमाळ महामंडळासाठी ७० कोटी असा भ्रष्टाचार करण्यात आला. आता खरेदीमध्ये नॅनो युरिया ११२ रुपये होता आणि घेताना २१२ रुपयांनी घेतला आहे. म्हणजे यात २१ कोटी २६ लाखांचा घोटाळा करण्यात आलेला आहे. नॅनो डीएपी ३०० रुपये प्रति ५०० मिलीबॅग एवढे किमतीला बाजारात मिळतो आणि यांनी घेतला ५९० रुपयांना. यात जवळपास ५६ कोटींचा भ्रष्टाचार करण्यात आला

## मराठी साहित्य मंडळ ,पेण आणि अहिल्या महिला मंडळ ,पेण यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित एक अग्निकुंड -स्वातंत्र्यवीर सावरकर पुण्यतिथी विशेष कार्यक्रमाचे संपन्न



स्वातंत्र्यवीर सावरकर पुण्यतिथीचे औचित्य साधून मराठी साहित्य मंडळ पेण आणि अहिल्या महिला मंडळ ,पेण यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित स्वा.सावरकर विचार जागृती मंच ,मुलुंड प्रस्तुत ङ्गएक अग्निकुंडङ्ग (सामाजिक प्रभोधनपर कार्यक्रम) रामेश्वर हॉल,पेण येथे पडला .सदर कार्यक्रमात माधवी नातू रचित पोवाड्याचं दृकब श्राव्य संगीतमय सादरीकरण झाले .

या निमित्ताने जुन्या व नवीन पिढयांना एकत्रित स्वातंत्र्यवीर सावरकरांचा जीवनपट उलगडून पाहता येणार आहे. येणा-या पिढयांना या कार्यक्रमाद्वारे स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या बहुआयामी प्रतिभेची ओळख होणार करून देण्यात आली .

कार्यक्रमाची सुरवात स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या गीताने झाली.स्वा. सावरकर विचार जागृती मंच ,मुलुंडतर्फे सुचेता नातू यांचं स्वागत मराठी साहित्य मंडळ पेण विद्यमान अध्यक्ष डॉ.देवीदास बामणे आणि उपाध्यक्ष प्रा.सतीश पोरे यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मागील १० वर्षांहून अधिक काळ मराठी साहित्य मंडळ पेणची जवाबदारी यथार्थ पेलणा-या माजी अध्यक्षा विभावरी जोशी यांनी केले. मराठी साहित्य मंडळ पेण संस्थेची ओळख मंडळाचे सचिव वैभव धनावडे यांनी उपस्थितांना करून दिली.

सदर कार्यक्रमाच्या नियोजनास माजी सचिव आणि मंडळाच्या माध्यमातून ३० वर्षांपेक्षा अधिककाळ पेणकरांना उत्तोमत्तम कार्यक्रम देणा-या बाळकृष्ण कमळकर यांचे मार्गदर्शन लाभले.कार्यक्रमाची सांगता विद्यमान खजिनदार आणि अहिल्या महिला मंडळाच्या माध्यमातून गेली अनेक वर्षे समाजभान जोपासणा-या अश्विनी गाडगीळ यांच्या आभार प्रदर्शनाने झाली.

मंगल देव पाटणकर यांचे विशेष सहकार्य कार्यक्रमास लाभले.

मराठी साहित्य मंडळ -पेण आजीव सदस्य व इतर रसिक प्रेक्षक यांची उपस्थिती मोठ्या प्रमाणात कार्यक्रमास लाभली.असे कार्यक्रम देशाभिमान जागृत करून स्वातंत्र्यवीर सावरकरांचे कार्य मनामनावर बिंबविण्यास मदतीचे ठरतील असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला. एक उत्तम कार्यक्रम आयोजित केल्या बद्दल उपस्थितांनी संस्थांवर कौतुकाचा वर्षाव केला.

## तुषार सिनलकर यांची तुफान फटकेबाजी

### तुषार छा गये.. म्हणत निवेदकाने व्यक्त केल्या आपल्या भावना



ता. १३ (पुणे प्रतिनिधी)

शिरूर टीचर प्रीमियर लीगमध्ये शिरूर तालुक्यातील रामलिंग येथे झालेल्या सामन्यामध्ये वाबळेवाडी शाळेच्या तुषार सिनलकर यांनी सलग तीन षटकार मारत प्रेक्षकांची मने जिंकून घेतली. तेव्हा स्टेडियमवर तुषार छा गये म्हणत निवेदकांनी त्यांचे कौतुक केले. तेव्हा तुषार सिनलकर यांच्या संघर्षमय खेळाची चर्चाच यावेळी परिसरात रंगली.

शिरूर टीचर क्रिकेट प्रीमियर लीगच्या माध्यमातून शिरूर तालुका पदवीधर प्राथमिक शिक्षक व केंद्रप्रमुख संघटनेच्या वतीने क्रिकेट स्पर्धेचे आयोजन रामलिंग स्टेडियम शिरूर येथे करण्यात आले होते. शिक्षकांचे बिट वाईज संघ यावेळी करण्यात आले होते. या क्रिकेट स्पर्धेमध्ये शिरूर तालुक्यातील एकूण बारा संघ सहभागी झाले होते. यावेळी झालेल्या चुरशीच्या सामन्यात सिनलकर यांच्या सिंहगड संघर्ष या संघाला विजयासाठी पाच षटकात ६१ धावा करायचे होत्या. यावेळी वन डाऊनला आलेल्या तुषार सिनलकर यांच्या तुफान भटकेबाजिने प्रेक्षकांची मने जिंकून घेतली त्यावेळी म्हणत निवेदकांनी त्यांचे कौतुक केले. यावेळी शिक्षक सक्षमीकरणाचे प्रेरणास्त्रोत संजय नाईकडे यांच्या प्रेरणेतून स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. शिरूर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी महेश डोके, गटशिक्षणाधिकारी बाळकृष्ण कळमकर, आणि रामलिंग शिरूर येथील महाराष्ट्र महिला क्रिकेट टीमच्या प्रतिनिधी आरती दसगुडे आदी मान्यवर यावेळी उपस्थितीत होते.

यावेळी मान्यवरांच्या उपस्थितीत रोख रक्कम व सन्मान चिन्ह देऊन त्यांना सन्मानित करण्यात आले. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन वाबळेवाडी शाळेने नुकताच त्यांचा सन्मान करत त्यांना पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

## महिलांना एसटी प्रवासात ५० टक्के सवलत दिल्याने एसटी तोट्यात गेली -प्रताप सरनाईक

मुंबई (: राज्यातील महिलांना एसटी प्रवासात ५० टक्के सवलत देण्यात आली होती. एकनाथ शिंदे मुख्यमंत्री असताना हा निर्णय घेण्यात आला होता. मात्र, या योजनेमुळे एसटी तोट्यात गेल्याचं राज्य सरकार वारंवार फेटाळत आलं आहे. आज अखेर यावर परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी भाष्य केलं आहे. पन्नास टक्के दिलेल्या सवलतीमुळेच एसटी तोट्यात गेली आहे. महिलांना व जेष्ठांना एसटी प्रवासात सवलतीमुळे एसटीला दर दिवशी तीन कोटी रुपयांचा तोटा होतो. त्यामुळे यापुढे एसटीमध्ये कोणतीच सवलत नाही, असं वक्तव्य परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी धाराशिवमध्ये केलं आहे. व्हाईस ऑफ मेडिया या पत्रकार संघटनेच्या कार्यक्रमात पत्रकारांना एसटीमध्ये सवलत द्या, अशी मागणी सरनाईक यांच्याकडे करण्यात आली आहे. यावेळी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी सवलतीमुळेच एसटी बस तोट्यात गेल्याचे वक्तव्य केलं आहे. या वक्तव्यामुळे महायुती सरकारच्या एसटी प्रवासात महिलांच्या सवलत योजनेमुळेच एसटी तोट्यात गेल्याची कबुलीत जणू परिवहन मंत्री यांनी दिली आहे. गेल्या सरकार काळामध्ये महिलांना एसटी प्रवासात ५० टक्के सवलत देण्याची योजना जाहीर करण्यात आली. तर ज्येष्ठांना मोफत बस देण्याची योजना आणण्यात आली. यानंतर महिलांनी मोठ्या प्रमाणात एसटीने प्रवास केल्याची आकडेवारी महायुतीच्या नेत्यांनी जाहीर केली होती. या योजनेमुळे एसटी तोट्यात गेल्याचा आरोप वारंवार विरोधकांकडून राज्य सरकार करण्यात आला. मात्र, राज्य सरकारने हे आरोप फेटाळले होते. आज अखेर यावर परिवहन मंत्री प्रताप सरनाईकांनी जाहीर कबुली दिली आहे. महिलांना, ज्येष्ठांना देण्यात आलेल्या सवलतीमुळेच एसटी तोट्यात गेल्याची कबुली परिवहन मंत्री प्रताप सरनाईकांनी दिली. महिला आणि ज्येष्ठांना एसटी प्रवासात सवलत देण्यात आली. यामुळे एसटीला दर दिवशी ३ कोटी रुपयांचा तोटा होतो आहे, असे सरनाईक म्हणाले. त्यामुळे यापुढे एसटीमध्ये कोणतीच सवलत नाही असं वक्तव्य परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी धाराशिव मध्ये केले. लाडक्या बहिणींना बस मध्ये ५०% सवलत ज्येष्ठ नागरिकांना मोफत बस या सवलतीमुळे परिस्थिती अशी झाली आहे. अशीच सवलत आपण जर सर्वांना देत बसलो तर मला असं वाटतं महामंडळ चालवणं कठीण होईल,

## स्वाभिमानी रिपब्लिकन महासभा संस्थेच्या वतीने विधी क्षेत्रातील योगदानाबद्दल कवी निवेदक ॲड.उमाकांत आदमाने यांना

## पद्मश्री पँथर नामदेव ढसाळ स्मृती पुरस्कार सोहळा २०२५ पुरस्कार

पद्मश्री पँथर नामदेव ढसाळ यांच्या जयंतीचे औचित्य साधून दि. १५ फेब्रुवारी २०२५ रोजी पुणे येथील पत्रकार भवन च्या सभागृहात विद्रोही कवी संमेलन व पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी राज्यातून आलेल्या कवींच्या वाणीतून विद्रोही कवितांचा हुंकार दिसून आला. तसेच लेखक कवी सामाजिक कार्यकर्ते अधिकारी यांना पुरस्कार प्रदान करण्यात आले. स्वाभिमानी रिपब्लिकन महासभा आयोजित विद्रोहाचा ज्यालामुखी संस्थेच्या वतीने कवी साहित्यिक, निवेदक ॲड.उमाकांत आदमाने, नोटरी, भारत सरकार यांना संस्थेचे अध्यक्ष मा. हरेशभाई देखणे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. प्रसंगी उद्घाटक दिग्दर्शक मा. संतोष संखद, संमेलनाध्यक्ष मा. हृदय मानव अशोक, पुणे सहाय्यक समाजकल्याण आयुक्त विशाल लोंढे, स्त्री चळवळीच्या अभ्यासका ॲड. अर्चना मोरे, कवयित्री पुष्पा क्षीरसागर, स्वां.रि.म.चे उपाध्यक्ष मा.सौ. रुपाली हरणशिकारे, सचिव ॲड. संगीता भालेराव आदि उपस्थिती मध्ये पुरस्कार प्रदान करण्यात आले. ॲड.उमाकांत मधुकर आदमाने हे सध्या शिवाजीनगर, जिल्हा सत्र न्यायालयात पुणे येथे वकिली व्यवसायाबरोबरच नोटरीचे देखील काम करतात त्यांची आणखी नवी ओळख म्हणजे सुंदर कवी, लेखक, साहित्यीक व सामाजिक बांधिलकी जपत आहेत त्यांनी आगामी काळात खुप सुंदर विवध विषयावर कविता सादर करून कवी रसिकांची मने जिंकली, ॲड.उमाकांत मधुकर आदमाने हे नोटरी असले कारणाने वकिली व्यवसाया बरोबरच त्यांनी साहित्य क्षेत्रात देखील आपला ठसा प्रामाणिकपणे उमटविला आहे, अनेक राष्ट्रीयस्तरीय, राजस्तरीय, जिल्हास्तरीय, विविध काव्यसंमेलनात सहभाग घेऊन साहित्य क्षेत्रातील सामाजिक क्षेत्रातील तसेच विधी क्षेत्रातील विविध उपक्रम सहित अनेक पुरस्कार त्यांना प्राप्त झाले आहेत, त्यामुळे सामाजिक बांधिलकी जपत राज्य शासनाने त्यांची दखल



घेत सामाजिक पुरस्कार सुद्धा बहाल केले राष्ट्रीय सेवा योजने अंतर्गत महाराष्ट्र शासनाचा ङ्गउत्कृष्ट स्वयंसेवक राज्य पुरस्कारफ मुंबई २००८-०९, व महाराष्ट्र शासनाचा ङ्गविशेष सामाजिक कार्य पुरस्कारफ लातूर २०१२

ॲड. उमाकांत आदमाने हे सध्या शिवाजीनगर, जिल्हा सत्र न्यायालयात पुणे येथे वकिली व्यवसाया बरोबरच नोटरीचे देखील काम करतात त्यांची आणखी नवी ओळख म्हणजे प्रसिद्ध कवी, निवेदक, लेखक, साहित्यीक व सामाजिक बांधिलकी जपत आहेत त्यांनी आगामी काळात खुप सुंदर विवध विषयावर कविता सादर करून कवी रसिकांची मने जिंकली, ॲड.उमाकांत आदमाने हे नुकतेच नोटरी झाले असले कारणाने वकिली व्यवसाया बरोबरच साहित्य क्षेत्रात देखील आपला ठसा प्रामाणिकपणे उमटविला आहे, अनेक राजस्तरीय, जिल्हास्तरीय, विविध काव्यसंमेलनात सहभाग घेऊन त्यांना साहित्य क्षेत्रातील सामाजिक क्षेत्रातील विविध उपक्रम आणि अनेक पुरस्कार त्यांना प्राप्त झाले आहेत, तसेच सामाजिक बांधिलकी जपत राज्य शासनाने त्यांची दखल घेत सामाजिक पुरस्कार सुद्धा बहाल केले राष्ट्रीय सेवा योजने अंतर्गत महाराष्ट्र शासनाचा ङ्गउत्कृष्ट स्वयंसेवक राज्य पुरस्कारफमुंबई २००८-०९, व महाराष्ट्र शासनाचा विशेष सामाजिक कार्य पुरस्कारफ लातूर २०१२स्वाभिमानी रिपब्लिकन महासभा फौंडेशनचे संस्थापक मा. हरेशभाई देखणे सरांनी आपल्या भाषणात सांगितले की या संस्थेने खूप कमी वेळात बरेच कार्यक्रम खूप सफलपणे आयोजित केले आहेत आणि प्रत्येक कार्यक्रमांमध्ये लांबून लांबून विविध क्षेत्रातील कार्य करणा-या कर्तुत्वान व्यक्तीच्या कार्याचा सन्मान सोहळ्यात सर्वांना आमंत्रित करून त्यांची सर्व प्रकारे सेवा केली आहे. या संस्थेद्वारे प्रत्येक वेळी कमीत कमी ५० ते १०० कवींना / व्यक्तींना आणि समाजसेवकांना प्रशस्तीपत्र, स्मृतिचिन्ह, देऊन विविध पुरस्काराने सन्मानित केले आहे. तसेच नवोदित कवी यांना नवनवीन कविता लिहिण्यासाठी प्रोत्साहित केले आहे.

या कार्यक्रमांमध्ये प्रस्तुत कार्यक्रमाचे सुत्र संचालन कवयित्री कविता काळे व श्री. सागरभाऊ वाघमारे या दोघांनी बहारदार केले आणि कार्याक्रमास एक वेगळी रंगत आणली तसेच या पुरस्कार सोहळ्यात आलेल्या पाहुण्यांचे आभार प्रदर्शन मा. ॲड. प्रविण कोल्हे सरांनी केले.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com